सकाळ



**शेटफळगढे (ता. इंदापूर) :** नागेश्वर विद्यालयात सायबर जनजागृती सत्रात सहभागी झालेले विद्यार्थी व शिक्षक.

# नागेश्वर विद्यालयात सायबर जनजागृती

**शेटफळगढे, ता. २३ :** शेटफळगढे (ता. इंदापूर) येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री नागेश्वर विद्यालय व ज्युनियर कॉलेज विद्यालयात तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती आणि क्विक हिल फाउंडेशन यांच्या वतीने 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमांतर्गत सायबर जागृती सत्र घेण्यात आले. या सत्रात विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, फेक लिंक्स आणि ओटीपी स्कॅम, पासवर्डचं रक्षण, आणि वैयक्तिक माहितीची गोपनीयता यावर उदाहरणांसह माहिती दिली.

प्राचार्य जितेंद्र गावडे यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करत उपक्रमाचे कौतुक केले आणि अशा प्रकारच्या कार्यक्रमांनी सायबर सुरक्षिततेबाबत जनजागृती नक्की होईल, असे मत व्यक्त केले.

यावेळी क्लबचे अध्यक्ष अभय साहु, सचिव संदीप माने, गतिविधी संचालक ज्योती गुरव, मीडिया संचालक सायली ढगे, सायबर वॉरिअर्स वृषाली जानभरे, माधवी कांबळे, बाळकृष्ण शिंदे आणि यश झिंजाडे यांचा समावेश होता. डॉ. काशिनाथ सोलनकर व एन. डी. दराडे यांनी उपक्रमाचे नियोजन केले. यावेळी प्राचार्य जितेंद्र गावडे, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य सुभाष लकडे, पर्यवेक्षिका आशा खोमणे आदी उपस्थित होते.